# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ४ थे अंक १४२ वा शुक्रवार दि.१५ नोव्हेंबर २०२४ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.


# राज्यातील महायुती सरकार घटनाबाह्य धीरज देशमुख यांना भरभरून आशिर्वाद द्यावा विरोधकांना सहकार क्षेत्र मोडीत काढायचा आहे त्यापासून सावध रहा माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांची विरोधकांवर टीका

## लातूर तालुक्यातील गादवड, चिंचोली ब, मुरुडअकोला, शिराळा येथे धीरज देशमुख यांच्या प्रचारार्थ संवाद बैठकीला मतदारांचा मोठा प्रतिसाद







लातूर :- राज्यातील महायुती सरकार हे घटनाबाह्य सरकार असून या सरकारने सर्व समाजाला फसवले आहे कुठलाच समाज घटकांना न्याय दिलेला नाही त्यामुळें येणाऱ्या विधानसभा निवडणुकीत काँग्रेस आघाडीचे उमेदवार आमदार धीरज विलासरावजी देशमुख यांना अधिक मताधिक्य देवुन विजयी करावे असे आवाहन राज्याचे माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी करत आपल्या भागातील सहकार क्षेत्र जपण्याचे काम आपल्या सर्वांच्या सहकार्याने झालेले आहे मात्र विरोधक मात्र हे सहकार क्षेत्र मोडीत काढण्याचा त्यांचा डाव असून त्यापासून आपण वेळीच सावध राहिले पाहिजे असे सांगून विकास कामासाठी आम्ही कटिबध्द आहोत पुढेही राहू असा शब्द माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी यावेळी दिला गुरुवारी लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघातील महा विकास आघाडीचे उमेदवार आमदार धीरज देशमुख यांच्या प्रचारार्थ लातूर तालुक्यातील मुरूड अकोला, चिंचोली, गादवड, शिराळा येथे आयोजित संवाद बैठकीत ते बोलत होते

यावेळी माजी आमदार अँड वैजनाथ शिंदे, राज्य साखर महासंघाचे संचालक आबासाहेब पाटील,मांजरा साखर कारखान्याचे माजी अध्यक्ष धनंजय देशमुख, मांजरा साखर कारखान्याचे संचालक अशोकराव काळे , बाजार समितीचे सभापती जगदीश बावणे, तालुका काँग्रेस उपाध्यक्ष दयानंद बिडवे, विजयमूर्ती शेटे विलास साखर कारखान्याचे संचालक अनिल पाटील, विलास साखर कारखान्याचे संचालक बाळासाहेब बिडवे, बाजार समितीचे संचालक शेळके, मीडिया सेलचे जिल्हाध्यक्ष हरिराम कुलकर्णी, भीमाशंकर शेटे, शेतकरी संघटनेचे नेते सत्तार पटेल अरुणदादा कुलकर्णी, मदन भिसे ,बंकट कदम यांच्यासह मान्यवर उपस्थित होते

गावातील मतभेद बाजूला सारून सर्वांगीण विकासासाठी धीरज देशमुख यांना अधिक मताधिक्य द्यावे

माजी मंत्री दिलीपराव देशमुख

आम्हाला काँग्रेसला या भागातून १९८० पासून आपण आशिर्वाद दिलेले आहेत तुमचे आमचे वेगळे नाते राहिलेले आहे या भागात रस्ते सिंचन शेतकऱ्यासाठी विविध योजना राबवून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम जिल्हा बँक, मांजरा साखर परिवारातील साखर कारखान्यानी केलेले आहे पुढेही आपण करणार आहोत आपण कधी पक्ष बदलला नाही आपला विचार काँग्रेस पक्षांचे विचार सर्व धर्म समभाव सामाजिक सलोखा निर्माण करणारा राहिलेला सर्व कामे करण्याचा प्रयत्न केलेला आहे जी काही कामे राहिलेली असतील ते आपण करण्यासाठीं कटिबध्द आहोत पुढेही राहू असे सांगून कोणी तरी येईल भूलथापा देईल यापासून आपण सावध राहिले पाहिजे एक चांगल काम या भागात सहकार क्षेत्रात नावलौकिक मिळवला आहे ते जपण्याचे काम आपल्या माध्यमातून करायचं आहे त्यामुळें लीड मिळेलच पण अधिक मताधिक्य पश्चिम भागातून मिळाव अशी अपेक्षा माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांनी यावेळी व्यक्त केली त्यावेळीं उपस्थित मतदारांनी दाद दिली

ठिकठिकाणी दिलीपराव देशमुख यांचे जल्लोषात स्वागत

गुरुवारी लातूर तालुक्यातील मुरुड अकोला येथील खंडोबा मंदिर, विठ्ठल मंदिर, शिराळा येथील नागोबा मंदिर, चिंचोली ब येथील भैरवनाथ मंदिरात जावून माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांनी दर्शन घेतले त्यानंतर संवाद बैठकीला प्रारंभ करण्यात आला गावागावात मोठ्या प्रमाणावर फटाक्याच्या आतषबाजीने स्थानीक ग्रामस्थांनी ढोल ताशांच्या गजरात स्वागत केले

धीरज देशमुख याना पश्चिम भागातून अधिक मताधिक्य मिळणार

माजी आमदार वैजनाथ शिंदे यांचे प्रतिपादन

लातूर तालुक्यातील पश्चिम भागात गेली ३०वर्षापासून विकासाची कामे पूर्ण झाली आहेत मांजरा साखर परिवारातील साखर कारखाने,जिल्हा बँकेने या भागातील लोकांना आर्थिक सुबत्ता देण्याचे काम केले होते माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख साहेब, माजी मंत्री दिलीपराव देशमुख साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली या भागात विकासाचे प्रश्न सोडविण्यासाठी सतत प्रयत्न केले लोकांच्या मदतीला धावून या नेत्यांनी लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला विकासाच्या बाबतीत पुढें घेवून दळण वळण व्यवस्था उभी राहिली त्यांचे श्रेय आदरणीय दिलीपराव देशमुख साहेब यांच्या कडे जाते उमेदवार आमदार धीरज देशमुख यांनी मागच्या पाच वर्षाच्या काळात या भागात अनेक चांगली विकासाचे प्रश्न सोडविण्यासाठी प्रयत्न केले आहेत जिल्हा बँकेकडून शून्य टक्के दराने पाच लाख रुपये देण्याची योजना राबवून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करण्याचे काम केले त्यामुळें या पश्चिम भागातून काँग्रेस आघाडीचे उमेदवार आमदार धीरज देशमुख यांना अधिक मताधिक्य मिळेल असा विश्वास त्यांनी यावेळी बोलताना व्यक्त केला आहे.

## जगन्नाथ गिरी यांचे निधन



केज/प्रतिनिधी तालुक्यातील पैठण येथील रहिवासी जगन्नाथ भागवत गिरी वय ५२ वर्ष यांना मंगळवार रोजी अज्ञात वाहनाने पाठीमागून जोराची धडक दिली होती या अपघातात ते गंभीर जखमी झाले होते .अंबाजोगाई येथील स्व रा ती रुग्णालयात उपचारादरम्यान त्यांचे निधन झाले. त्यांच्यावर पैठण येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. आई ,पत्नी,दोन मुली एक मुलगा असा परिवार आहे. धार्मिक कार्यक्रमात अग्रेसर असणारे देवबप्पा म्हणून ते सर्व परिचित होते. निधनाबद्दल सर्वत्र हळहळ व्यक्त केली जात आहे.

## काँग्रेसच्या नेत्या माजी नगराध्यक्षा उषा कांबळे यांचा चार माजी नगरसेवकासह राष्ट्रवादी काँग्रेस मध्ये प्रवेश



उदगीर / प्रतिनिधी :- शहरातील म. फुलेनगर येथील प्रचार सभेत काँग्रेस पक्षाच्या नेत्या माजी नगराध्यक्षा उषा कांबळे यांनी काँग्रेसला रामराम ठोकत ना. संजय बनसोडे यांच्या नेतृत्वाखाली राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात काँग्रेसच्या चार माजी नगरसेवकासह प्रवेश केला. यावेळी त्यांच्यासोबत माजी नगरसेवक श्रीरंग कांबळे, माजी नगरसेवक राजकुमार भालेराव, विलास शिंदे, अशोक जमदाडे यांच्यासह अनेकांनी प्रवेश केला. उषा कांबळे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात प्रवेश केल्यामुळे महायुतीची ताकद वाढली असून त्यांना आगामी काळात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षात सन्मानाची वागणूक दिली जाईल अशी ग्वाही ना. संजय बनसोडे यांनी दिली.

यावेळी बोलताना माजी नगराध्यक्षा उषा कांबळे यांनी आपण गेल्या अनेक वर्षांपासून काँग्रेस पक्षात निष्ठेने काम केले आहे. मात्र महाविकास आघाडीच्या उमेदवारांकडून आपल्याला सन्मानाची वागणूक मिळाली नाही. प्रामाणिकपणे प्रचारात असताना अविश्वास दाखविण्याचा प्रयत्न केला गेला. याउलट महायुतीचे उमेदवार ना. संजय बनसोडे यांनी मी विरोधी पक्षाची सामान्य कार्यकर्ता असताना माझा नेहमीच सन्मान केला असल्याचे सांगत उषा कांबळे यांनी उदगीरच्या विकासासाठी आपण ना. बनसोडे यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असल्याचे सांगितले. महायुतीने प्रकाशित केलेला जाहीरनामा हा महिलांना सन्मान देणारा आहे. हा जाहिरनामा आपल्याला आवडला असल्यानेच आपण महायुतीमध्ये आल्याचे सांगून उषा कांबळे यांनी महायुतीचे उमेदवार संजय बनसोडे यांना मोठ्या मताधिक्याने विजयी करण्याचे आवाहन केले.

## मतदार संघातील ९१ हजार महिलांना लाडकी बहिण योजनेचा लाभ : ना.संजय बनसोडे

### आपला मुलगा म्हणून माझ्यावर पुन्हा एकदा विश्वास दाखवा

उदगीर/ प्रतिनिधी :- उदगीर मतदार संघातील प्रत्येक जातीधर्मातील मतदार माझ्या पाठीशी खंबीरपणे उभा असल्याने मागील पाच वर्षाच्या काळात मतदार संघात विकासाचा डोंगर उभा केला. शासनाच्या विविध योजना सर्वसामान्यांच्या दारापर्यंत पोहोचवल्या. महायुती सरकारने बेरोजगार तरुण शेतकरी कष्टकरी व सर्वसामान्य माणसाचे हित डोळ्यासमोर ठेवून विविध कल्याणकारी योजना आणल्या त्यातच मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण या योजनेतून विविध महिला भगिनींना व्यवसायासाठी या योजनेचा लाभ मिळाला त्यामुळे अनेक माझ्या बहिणी आनंद व्यक्त करून महायुती सरकारच्या पाठीमागे आम्ही खंबीरपणे उभे असल्याची ग्वाही दिली. आपल्या मतदार संघातील ९१ हजार महिलांना लाडकी बहिण योजनेचा लाभ झाल्याने मला समाधान वाटले असल्याचे मत उदगीर विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार राज्याचे क्रीडा व युवक कल्याण मंत्री ना. संजय बनसोडे यांनी व्यक्त केले.





उदगीर विधानसभा मतदार संघातील महायुतीचे उमेदवार क्रीडामंत्री संजय बनसोडे यांच्या प्रचारार्थ म.फुले नगर येथील चौकात प्रचार सभेचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी ते बोलत होते. यावेळी माजी आ.गोविंद केंद्रे, माजी नगराध्यक्ष राजेश्वर निटुरे, , माजी नगराध्यक्ष बसवराज बागबंदे, सुधीर भोसले, मनोज पुदाले, विजय निटुरे, , सय्यद जानीमियाँ, प्रा.श्याम डावळे, अनिल मुदाळे, फैजुखाँ पठाण, बापूराव येलमटे, सनाउल्ला खान, बापू सोळुंके, उत्तरा कलबुर्गे, शशिकांत बनसोडे, इब्राहिम पटेल, शिवकुमार कांबळे, मधुमती कनशेट्टे, वर्षा कांबळे, वैशाली कांबळे, पप्पु गायकवाड, व्यंकट कांबळे, राजकुमार चव्हाण, प्रदीप जोंधळे, हुसना बानो, जितेंद्र शिंदे, समद शेख, इम्तियाज शेख, फय्याज शेख, आदी उपस्थित होते.

यावेळी बोलताना क्रीडामंत्री बनसोडे म्हणाले की, आजची सभा ही ऐतिहासीक आहे. खरं तर उमेदवारी अर्ज दाखल केला त्याच दिवशी आपल्या सर्वांचे प्रेम पाहुन मी भारावुन गेलो. आपल्या सर्वांच्या उपस्थितीमुळे विरोधक पूर्णतः हतबल झाले आहेत. त्यांच्या पातळी सोडून बोलण्यातून त्यांची हतबलता लक्षात येत आहे. मी तथागत गौतम बुद्धांच्या संस्कारात वाढलेला कार्यकर्ता आहे. आंबेडकरी चळवळीत माझी जडण - घडण झाली असुन मी कार्यकर्ता ते मंत्री हे आपल्या सर्वांच्या जीवावर झालो आहे. त्यामुळे मी पातळी सोडून कधीही बोलणार नाही. मी पाच वर्षात काय विकास कामे केली आणि पुढील काळात काय करणार आहे यावर चर्चा करून निवडणूक लढवीत आहे. विरोधी पक्षाचे उमेदवार दहा वर्षे आमदार होते. या दहा वर्षात त्यांनी उदगीरसाठी काय केले असा सवाल यावेळी मंत्री बनसोडे यांनी केला. मला आमदार मंत्री करून आयुष्यभर विसरता येणार नाहीत असे उपकार या भागातील जनतेने केले आहेत. त्या उपकाराची परतफेड करण्यासाठी मी पाच वर्षे रात्रीचा दिवस करून काम करीत राहिलो आहे. मराठवाड्यात कुठेही नाही असे बुद्धविहार आपल्या तळवेस येथे उभारुन राष्ट्रपती महोदयांच्या हस्ते या भव्य दिव्य वास्तूचे ऐतिहासिक उद्घाटन करून उदगीरचे नाव देशपातळीवर वाढविले आहे. उदगीर विधानसभा मतदार संघ राखीव मतदार संघ असताना देखील या मतदारसंघात सर्वाधिक विकासाचा निधी आणला असल्याचेही यावेळी मंत्री बनसोडे म्हणाले.

यावेळी म.फुलेनगर, संजयनगर, मुसानगर आदी भागातील हजारो नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सारसा येथील असंख्य मुस्लिम बांधवांचा भारतीय जनता पार्टी मध्ये जाहीर प्रवेश





लातूर :- लातूर ग्रामीण विधानसभा मतदारसंघातील भाजपा व मित्रपक्ष महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वावर विश्वास ठेवून लातूर तालुक्यातील मौजे सारसा येथील असंख्य मुस्लिम बांधवांनी भारतीय जनता पार्टी जाहीर प्रवेश केला.

लातूर येथील भाजपाच्या संवाद कार्यालयात भाजपा नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत झालेल्या पक्ष कार्यक्रमास भाजपाचे किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, रेणापुरचे प्रथम नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, भाजपाचे रेणापूर तालुका अध्यक्ष अँड दशरथ सरवदे, लातूर तालुका अध्यक्ष बन्सी भिसे, कारसा येथील चेअरमन शरद शिंदे, सय्यद लाला यांच्यासह इतर अनेकांची उपस्थिती होती

भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते लातूर तालुक्यातील मौजे सारसा येथील इस्माईल पठाण, समीर सय्यद, अक्खर पठाण, किस्मत पठाण, सलीम पठाण, सोहेल पठाण, शहबाज पठाण, अलीसा पठाण, अल्ताफ पठाण, मिठू सय्यद, एजाज पठाण, सलार पठाण यांच्यासह अनेकांनी भारतीय जनता पार्टीत जाहीर प्रवेश केला यावेळी आ. कराड यांनी सर्वांचे स्वागत केले. कोणाच्याही विश्वासाला तडा जाणार नाही असे सांगून लातूर ग्रामीण मतदारसंघात परिवर्तन शंभर टक्के होणार आहे ही काळा दगडावरची पांढरी रेघ असून आपण सर्वांनी भाजपा महायुतीला मताधिक्य मिळावे यासाठी मेहनत घ्यावी असे आवाहन केले.


दैनिक महावृत्त पहा ऑनलाईन कोठेही mhavratt.com या वेबसाईटवर पाहता येणार

## संपादकीय....


# म्हाताऱ्या शब्दांचा आरसा

महागाईचा दर ६.२ टक्क्यांवर गेल्याने रिझर्व्ह बँकेकडून व्याज दरकपात नाही आणि रुपया घसरल्याने आयात आणखी महाग, हे मध्यमवर्गावरच शेकणार यशस्वी, हुशार, घरंदाज आहे पण तो दांभिक, आत्ममशगूल, संधिसाधूही आहे – जगाच्या पाठीवर कुठेही गेलात तरी मध्यमवर्गाचे चरित्र यापेक्षा वेगळे नसणारच. सध्या निवडणुकांचा माहौल आहे. सर्व पक्ष त्यांच्या प्रचारनाम्यांसह सज्ज झाले आहेत. पण या धामधुमीत सर्वात दीन, दुर्लक्षित घटक तो मध्यमवर्गच. आपल्या लोकसंख्येतील तो तिसरा हिस्सा. या अर्थाने बहुजन आणि खरे तर लौकिकार्थाने वंचितही. तरी निवडणूकनाम्याचा त्याला भाग बनवावे असे कोणास वाटू नये हे दुर्दैवीच. विचारक्षम, बोलका, जनमताला हवे तसे वळण लावणारा, लावू शकणारा हा समाजघटक स्वप्न पाहणाराही. स्वप्नपूर्तीसाठी कष्ट उपसणारा, प्रसंगी कर्ज–उसनवारीतून हवे ते मिळवू पाहणारा. आयुष्यभर हप्ते / बँकांच्या ईएमआयच्या चरकात गुलामासारखा पिचणाराही तोच. महिन्याकाठी मिळणाऱ्या मेहनतान्यातील एक हिस्सा सरकारला बिनबोभाट देणारा सक्तीचा सर्वात मोठा करदाता वर्ग तोच. शहरातील बकाली, दुरवस्था, घुसमटून टाकणारा रोजचा काही तासांचा जीवघेणा प्रवास, त्यातील घुसमट, धक्काबुकी, मारामाऱ्या म्हणजे त्याच्या जीवनाचा नित्य नाइलाजच. महागाई, अनारोग्य, किमती कितीही वाढल्या तरी प्रसंगी पोटाला चिमटा देत घर चालवण्याच्या खस्ताही सर्वाधिक त्याच्याच वाट्याला. मध्यमवर्गीय कायम सामान्यच असतो आणि हा आम कधी तरी खास बनेल, असे त्याचे स्वप्न हे स्वप्नच बनून राहते. त्याच्यासाठी अल्प–स्वल्प का असेना आनंदवार्ता आताशी दुर्मीळच. पण त्याच्या मनाचा कोमेजलेला कोपरा पार करपून जाईल अशा संकटवार्तांच्या मालिकांनीच वातावरण भारलेले असणे हे शोचनीयच. सणासुदीला हटकून उजळणाऱ्या मध्यमवर्गासाठी यंदाचा दीपोत्सव फिकाच ठरला. ऐन उत्सवी दिवस भांडवली बाजारातील निराशा आणि नित्याच्या पडझडीत पोर्टफोलिओला झालेले नुकसान मोजण्यात त्याचे गेले. खरेदीचा नेहमी दिसणारा त्याचा उत्साहही मावळला. आता तर खरेदीच परवडेनाशी ठरेल अशा अस्मान गाठणाऱ्या महागाईची हताशा त्यावर स्वार होताना दिसत आहे. महागाईतून महागाईकडेच जाणारे हे भीतीदायी दुष्टचक्र–त्याचा परीघ वाढत चालला आहे. शहरी मध्यमवर्ग वाढत्या महागाईने नित्योपयोगी चीज–वस्तूंवरील खर्चासाठी हात आखडता घेतो आहे. शहरी बाजारपेठांतील मागणी कधी नव्हे ती सलगपणे घसरत आहे. त्याची परिणती ग्राहकोपयोगी वस्तू–सेवांच्या उत्पादकांची मिळकत घटण्यात दिसत आहे. कुटुंबाच्या अंदाजपत्रकाला लागलेल्या कात्रीची झळ ही मागणीच घसरल्याने कंपन्यांच्याही उत्पन्नाला ज्याची पुढची परिणती शेअर बाजारातील कंपन्यांच्या समभागांच्या पडझडीला कारणीभूत. म्हणजे जाच पुन्हा भागधारक/ गुंतवणूकदाराच्या भूमिकेत असलेल्या मध्यमवर्गालाच. या दुष्टचक्राचा नवा पैलू म्हणजे ग्राहक किमतीवर आधारित किरकोळ महागाई दराने चौदा महिन्यांतील गाठलेल्या सर्वोच्च स्तरावर जाण्याचा आहे. हा दर सरलेल्या ऑक्टोबरमध्ये ६.२ टक्क्यांवर जाणे, हे त्याच्या नियंत्रणाची भूमिका बजावणाऱ्या रिझर्व्ह बँकेच्या अंदाज–आडाख्यांचा फज्जा उडवणारा आहे. जोडीला ढासळत्या रुपयाच्या मूल्याचा परिणाम जोडून पाहिला तर मध्यम अवधीसाठी घोंघावत्या भयानक संकटाचे द्योतकच. पुन्हा मध्यमवर्गासाठी आशादायी असे ‘विकसित भारता’चे स्वप्न आणि देशाच्या दीर्घोद्देशी आर्थिक यशोगाथेबाबत प्रश्नचिन्ह निर्माण व्हावे असे हे घातसत्रच. हे असे अगदी विपरीत घडते आहे, पण ते कशामुळे? किंबहुना ते घडवून आणले गेले आहे काय, असा प्रश्नच यानिमित्ताने अधिक समर्पक ठरावा. भाज्यांच्या किमती वाढल्या. कांद्यापाठोपाठ, टोमॅटोचे भावही चढत गेले. हे लहरी हवामानाचे तडाखे अटळच आणि त्याचे घाव अधूनमधून बसतच असतात. ते तात्कालिक आहेत हे खरे मानले तरी वार्षिक तुलनेत भाज्यांच्या किमती ४२ टक्क्यांनी वाढाव्यात? कडधान्य, खाद्यातेलाच्या किमतीतही महिन्यागणिक दोन अंकी दराने गेले काही महिने वाढ सुरूच आहे. एकंदरीत खाद्यान्न महागाईने सरलेल्या महिन्यांत ११ टक्क्यांच्या कळसाला गाठले आहे. हे आपोआप घडलेले आहे काय? या प्रश्नाला उत्तर आहे ते म्हणजे सरकार आणि त्याची धोरणे. मतपेटीवर नजर ठेवून घडवून आणला गेलेला हा जनतेचाच घात आहे. तो कसा?

त्यासाठी थोडे मागे वळून पाहायला हवे. काही महिन्यांपूर्वी उरकलेल्या लोकसभा निवडणुकीतील चित्रातून आणि निकालातून काही गोष्टींचा उलगडा होतो. निवडणुकांत शेतकऱ्यांमधील मोठी नाराजी आणि काही ठिकाणी तर विरुद्ध दिशेने झालेले धुव्रीकरण विद्यमान सत्ताधाऱ्यांनी फारच मनावर घेतले. मग शहरी ग्राहक आणि त्याचा वाढत्या किमतीपासून बचाव करावा, हा रुळलेला प्राधान्यक्रम मागे पडला. त्याऐवजी आता शेतकऱ्यांना खूश करण्याच्या खटपटी सुरू झाल्या. शेतकरीबहुल हरियाणा विधानसभेच्या निवडणुका हे त्यासाठी चांगले निमित्त ठरले. सप्टेंबरच्या अखेरीस मग अकस्मात काही निर्णय जाहीर झाले. कांद्यावरील किमान निर्यात मूल्य रद्द करणे आणि निर्यात शुल्क कमी करणे, खाद्यातेलावरील आयात शुल्क वाढ अशा त्या अनेक निर्णयांचे जे अपेक्षित नव्हते तेच परिणाम उलटून पुढे आले. कांद्याचे भाव वधारले. खाद्यातेलाचे भाव पहिल्या दोन दिवसांत लिटरमागे ३०–३५ रुपयांनी वाढले. देशातील तेलबिया आणि तेल उत्पादकांना चांगला भाव मिळावा यासाठी सोयाबीन, पाम तेलाच्या आयातीला महाग बनविले गेले. पण ना भुईमूग, सूर्यफूल, मोहरी शेतकऱ्यांना संधी गवसली, ना देशांतर्गत तेल उत्पादकांना ते प्रोत्साहन ठरले. प्रत्यक्षात ऐन दिवाळीत तेलाच्या किमती वाढल्याचा जाच ग्राहकांच्या वाट्याला आला. महागाईच्या भडक्याचे मूळ हे सरकारच्या भरकटलेल्या शेती–धोरणांत आहे, या सनातन वास्तवाचीच ही नवीन प्रचीती. आता कांद्याने पुन्हा शंभरीचा भाव गाठला अशी ताजी बातमी आहे.

# जनगणना कशी होते? प्रगणकांना कोणते अनुभव येतात?

स्वातंत्र्यानंतरची देशातील आठवी दशवार्षिक जनगणना २०२५मध्ये होणार आहे. अंदाजे १४१ कोटी लोकसंख्येची, ३० लाख प्रशिक्षित कर्मचाऱ्यांद्वारे केल्या जाणाऱ्या या जनगणनेसाठी कोट्यावधी रुपयांचा खर्च होण्याची शक्यता आहे. २०२६ मध्ये सर्व सांख्यिकी माहिती अधिकृतपणे जाहीर होणे अपेक्षित आहे. नागरिकांसाठी विविध विकास योजना, पायाभूत सुविधा, सार्वजनिक सोयी उपलब्ध करून देताना जनगणनेतून मिळालेल्या माहितीचा उपयोग होतो. भारतासारख्या प्रचंड मोठ्या देशात जनगणना करणे आणि घेणे हे अतिशय आव्हानात्मक काम आहे. ते यशस्वी होण्यामागे त्यात सहभागी होणाऱ्या सर्व सरकारी कर्मचाऱ्यांचे योगदान महत्त्वपूर्ण ठरते. भारतासाठी ही एक अभिमानाची आणि गौरवाची गोष्ट आहे.




महाविद्यालयात ‘लोकसंख्याशास्त्राचे समाजशास्त्र’ हा विषय शिकविताना २०११मध्ये प्रत्यक्षात जनगणनेचे काम करण्याची संधी मिळाली. परिणामी तो विषय अधिक रंजक पद्धतीने विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचविणे शक्य झाले. नेहमीप्रमाणे शिकविण्याच्या जबाबदारी असतानाच काही ‘सरकारी कामे’ आली की जसा त्रागा होतो, तसा झालाही. निवडणुकीचे काय किंवा जनगणनेचे काय, कोणत्याही स्तरावरच्या शिक्षकांची त्यातून सुटका नाही. शिक्षकांना अध्यापनाचे कामही वेळेत पूर्ण करावे लागते. अनेक खासगी जबाबदाऱ्याही असतात आणि त्यातच ही सरकारी कामे येतात. त्यामुळे अनेक प्रकारच्या अडचणींना शिक्षक तोंड देत असतात. पण राज्यशास्त्राच्या एक शिक्षिका आम्हाला त्या कामाचे महत्त्व समजावून सांगत आणि ‘ते काम आपल्याला मिळते हा एक अभिमानाचा भाग आहे,’ हेदेखील पटवून देत. जनगणनेची ‘ड्युटी’ यादी आल्यावर पहिल्यांदा त्यात कोण कोण ‘अडकले’, कोणाची ‘सुटका झाली’ हे पाहिले जाते! सुटलेले कसे सुटतात, कोणाचा वशिला लावतात, यावर चर्चा घडतात. मग आपण जर ‘अडकलेल्यांमध्ये’ असू (जे नेहमी असतोच) तर शेवटी आपल्याबरोबरच्या ‘समदु:खीं’बरोबर पुढचा प्रवास सुरू होतो. बऱ्याचदा या कामात आपण आणि आपले नेहमीचे सहकारी यांना वेगवेगळ्या भागात पाठविले जाते, त्यामुळे प्रशिक्षणाला नव्याने भेटणारे आपले नवे सहकारी बनतात. साधारणतः सगळेजण थोड्या काळासाठी चालणाऱ्या या कामात एकमेकांबरोबर चांगले जुळवून घेतात. क्वचित काही विक्षिप्त असतात पण थोड्याफार प्रयत्नांनी त्यांच्याशीही जुळवून घेता येते. मोठ्या प्रमाणावर प्रगणकांना प्रशिक्षण दिले जाते. अडचणीच्या वेळी मदतीला अधिकारी वर्ग तत्पर असतो. प्रत्यक्ष जनगणनेत काही कुटुंब किंवा भाग त्रासदायक ठरत असतील तर प्रगणकांबरोबर परिस्थिती हाताळण्यासाठी अधिकारीही असतात. यात मजेचा एक भाग म्हणजे सगळ्या प्रगणकांकडून त्यांनी ज्या भागाची जनगणना केली त्या भागाचा एक नकाशा अगदी तपशीलवार तयार करून घेतला जातो. सारेच प्रगणक आर्किटेक्ट असल्यासारखे तो बनवतात! बऱ्याचदा तिथल्या स्थानिकांनाही समजणार नाही ‘हा आपल्या भागाचा नकाशा आहे’ असे नकाशे तयार होतात. यासाठी सरकारने काहीतरी सॉफ्टवेअर तयार केले पाहिजे. जनगणना, निवडणूक कामाचे पैसे पण वेळेत जमा होतात, काही अपवाद असू शकतात. माझ्याबरोबरच्या एक सहकारी अमराठी होत्या आणि त्यांना पुण्यातल्या कसबापेठेच्या एका भागाची जनगणना करायचे काम होते. पहिला दिवस आम्ही दोघी बरोबर फिरलो. त्यांच्या बोलण्यात गोडवा असल्याने त्यांनी हे काम छान पूर्ण केले. आणखी एक सहकारी ‘असले’ काम करावे लागते म्हणून ‘असिस्टंट’ ठेवून काम करून घेत होत्या. माझ्याकडेही कसब्यातला एक भाग होता. मी कसब्यातच लहानाची मोठी झालेली असले, तरी मला दिलेला भाग वेगळा असल्याने कसबा नव्याने समजला. जात, धर्म, आर्थिक परिस्थिती, सर्वार्थाने वेगळा भाग; परंतु काही समस्या आली नाही. उलट ‘सरकारी लोक’ घरी आले आहेत म्हणून आपुलकीने लोक घरात बोलावत. बसण्यास सांगत, चहा–पाणी विचारत. एक दोन घरे तर लग्नघरे होती, तिथे चिवडा–लाडूंचाही आग्रह झाला होता. घरचे म्हातारे–कोतारे एकटे असतील तर जमेल ती माहिती देऊन इतरही सुखदुःखाच्या गोष्टी सांगत. एक आजी, मुलगा नोकरीला गेल्यावर मतिमंद नातीला दिवसभर सांभाळत. नातीबद्दल सांगताना, कुणीतरी आपले ऐकून घेतेय याचेच त्यांना छान वाटले होते. काही घरांमध्ये घरातला कर्ता पुरुष दारूचे व्यसन असलेला, नोकरी धंदा नसलेला होता. राबणाऱ्या स्त्रिया ‘घरात टीव्ही आहे का? फ्रीज आहे का?’ विचारल्यावर त्या व्यसनी पुरुषाच्या नावाने खडे फोडत.

काही ठिकाणी ‘तुम्हाला या कामाचे किती पैसे मिळतात? तुम्हाला नोकरी असताना ही कामे का देतात? आमची पोरे बेकार आहेत त्यांना का नाही देत?’ असे अनेक उलटसुलट प्रश्न विचारले जाते. माझील प्रश्नावली भरून झाल्यावर त्यांच्या प्रश्नांचीही उत्तरे द्यावी लागत. काही घरे मोडकळीस आली होती. तिथे चढून जाणे जिकिरीचे वाटे. त्यामुळे ‘कशी राहत असतील ही माणसे?’ असा प्रश्न पडत असे. काहीजण घरात समोरच टीव्ही, फ्रीज दिसत असूनही ‘नाही’ म्हणायचे. मग ‘हे काय आहे’ विचारले की ‘शेजाऱ्यांनी दिलाय त्यांचा ठेवायला’ असे सांगत. शेजारच्या घरातही तेच उत्तर मिळत असे! आपली खरी परिस्थिती सांगितली तर काहीतरी त्रास मागे लागेल असेही काहींना वाटे. जनगणना, निवडणुकीची कामे करताना सर्वांनाच असे अनुभव येत असतात. काम संपताना, सगळ्या नवीन सहकाऱ्यांचा निरोप घेताना, आपण खूप चांगले काहीतरी केल्याचे समाधान वाटत राहते, जसे आमच्या त्या राज्यशास्त्राच्या सहकारी म्हणाल्या होत्या तसे. अहवाल प्रकाशित झाल्यावर तर यातील काही आकडे मी मिळवले, या विचाराने कॉलर ताठ होत असे. प्रत्येकाने त्याच्या घरी माहिती मागण्यासाठी येणाऱ्या प्रगणकांना आदराने वागवले पाहिजे आणि प्रत्येक प्रगणकाने हे काम करण्याची संधी आपल्याला मिळाली, याचा अभिमान बाळगला पाहिजे.

# धारावीविषयी नवा दृष्टिकोन हवा!

आशिया खंडातील सर्वांत मोठी झोपडवस्ती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या धारावीच्या सध्याच्या पुनर्विकास धोरणाला तिलांजली देणे तर गरजेचे आहेच, मात्र ते करताना धारावीकरांना फुकट आणि मोठ्या घरांचे मृगजळ न दाखवता मुंबईच्या शाश्वत विकासात त्यांना सहभागी करून घेणारे धोरण मांडणे गरजेचे आहे धारावी पुनर्विकास प्रकल्प बांधकाम व्यवसायाचा अनुभव नसणाऱ्या आणि मुंबईबाहेरील अदानी उद्योग समूहाला देण्यात यावा की नाही, यावर सध्या बरीच मतमतांतरे दिसतात. या प्रकल्पामुळे अदानी उद्योग समूहाला प्रकल्पाची ५४० एकर जमीन, मुंबईमधील विविध ठिकाणच्या ५०० एकर जमिनी, विकास करात सूट आणि हस्तांतर होणाऱ्या चटई क्षेत्रात वाटा मिळाला आहे. पुनर्विकासाचे अनेक उत्तम पर्याय उपलब्ध असताना ते डावलून मुंबईच्या होऊ घातलेल्या या लुटमारीला जाणत्या मुंबईकरांचा पाठिंबा नाही. पण केवळ हा प्रकल्प अदानी समूहाकडून काढून घेणे मुंबईकरांच्या भविष्याच्या दृष्टीने का पुरेसे नाही हेही पाहायला हवे सुमारे ३० वर्षांपूर्वी शिवसेनाप्रमुख यांनी झोपडपट्टीमुक्त मुंबईचे स्वप्न पाहिले. अर्थव्यवस्था, शहरांबद्दलचे अपुरे ज्ञान आणि प्रशासकीय अनुभवाचा अभाव यामुळे ते स्वप्न प्रत्यक्षात येऊ शकले नाही. याच चुकांच्या पायावर शिंदेंच्या नेतृत्त्वाखालील युती सरकारने धारावी पुनर्विकास प्रकल्प अदानींना सोपविला. मुंबईकरांनी यामागचे राजकारण आणि अर्थकारण समजून घेणे आवश्यक आहे. त्यासाठी काही वर्षे मागे जाऊन परिस्थिती समजून घ्यावी लागेल. मुंबई स्वतंत्र महाराष्ट्राची राजधानी झाल्यापासून येथील अर्थव्यवस्था झपाट्याने वाढू लागली. सत्तरच्या दशकात मराठवाड्यात महाप्रचंड दुष्काळ पडला. या दोन कारणांमुळे स्थलांतरितांचे लोंढे मुंबईभर पसरू लागले. तेव्हा स्थलांतरितांना विरोध हा राजकीय मंत्र असल्याने त्यांना वाढत्या शहरात सामावून घेण्याचा विचार झाला नाही. धोरणाच्या अभावाचा गैरफायदा घेत जमीन माफियांनी झोपडवस्त्या वसवून स्थलांतरितांना आश्रय दिला. कायदा आणि शासकीय बळाचा वापर होऊनही अशा वस्त्यांत वाढ होतच राहिली. मोक्याच्या जागी, खाडी आणि दलदलीच्या जमिनींवर धारावी कोळीवाड्यालगत असलेल्या जमिनीवर अनधिकृत उद्याोग आणि वस्ती प्रस्थापित झाली ती याच काळात. अशा राजकीय–प्रशासकीय हतबलतेच्या काळात नाईलाजाने झोपडपट्ट्यांच्या पुनर्विकासाचा विचार सुरू झाला. १९८५ साली राजीव गांधी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारने धारावी झोपडवस्ती पुनर्विकासासाठी १०० कोटी रुपयांचा निधी दिला. रहिवाशांनी गृहनिर्माण संस्था स्थापन केल्या. म्हाडाने जमीन विनामोबदला दिली. मालकी हक्काच्या घरासाठी रहिवाशांनी बांधकाम खर्चात वाटा उचलला. रहिवाशांचा सामूहिक आर्थिक सहभाग आणि म्हाडाच्या आर्थिक, तांत्रिक प्रशासकीय मदतीतून दहा वर्षांत ३८०० घरे बांधली गेली. लोकांच्या गरजा आणि ऐपत या दोन्ही निकषांचा विचार करून याच धर्तीवर इतर झोपडपट्ट्यांसाठी शासनाने ‘स्लम रिडेव्हलपमेंट स्कीम’ तयार केली. ही सर्व प्रक्रिया आशादायक असली तरी संथ होती. परंतु त्याला अचानक खीळ बसली. दहा वर्षांत– १९९५ मध्ये मुंबई झोपडपट्टीमुक्त करण्याचे आश्वासन देत महाराष्ट्रात शिवसेनेने सत्ता मिळवली. बाळासाहेब ठाकरे यांचे हे स्वप्न वास्तवात आणण्यासाठी सरकारने धोरण आखले. प्रत्येक पात्र झोपडी धारकाला २५० चौ. फुटांचे मालकी हक्काचे घर विनामोबदला देण्याचे आश्वासन दिले गेले. खासगी



विकासकांना वाढीव चटई क्षेत्राच्या बांधकामातून रास्त नफा मिळेल आणि त्यातून ते झोपडीवासीयांसाठी घरे बांधतील असा साधा–सोपा हिशेब त्यामागे होता. शासनाला आणि झोपडीवासीयांना पैसे खर्च करावे लागणार नव्हते आणि तरीही झपाट्याने मुंबई झोपडपट्टीमुक्त होईल अशी अपेक्षा तेव्हा होती. सर्वांना लाभ देणारी ही योजना आकर्षक वाटली नसती तरच नवल. त्यामुळे तेव्हा त्याला पुरेसा राजकीय विरोध झाला नाही. वाढीव चटई क्षेत्राच्या मोबदल्यात फुकट घरांचे धोरण हा विकासकांचा कुटिल डाव आहे, हे तेव्हाच्या अनुभवी आणि अर्थव्यवस्थेची जाण असणाऱ्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी ओळखले होते. त्यांनी या धोरणाला विरोध केला होता, पण त्यांचा सल्ला डावलून राज्य शासनाने झोपडपट्टी पुनर्वसन योजना (एसआरएस) जाहीर केली. त्यासाठी झोपडपट्टी पुनर्वसन संस्था स्थापन केली. पुढे विकासकांचा नफा कायम राहण्यासाठी चटई क्षेत्राचे प्रमाण सतत वाढवले गेले. एवढ्या खटाटोपानंतरही गेल्या ३० वर्षांत जेमतेम तीन–साडेतीन लाख झोपडवासीयांनाच घरे मिळू शकली आहेत. अनेक झोपु योजना परवानगी असूनही विकासकांनी सुरू केलेल्या नाहीत. मुंबईत आजही मोठ्या प्रमाणावर झोपडपट्ट्या दिसतात त्या यामुळेच. झोपु धोरणाचा आधार घेत परदेशस्थ आर्किटेक्ट मुकेश मेहता यांनी धारावीचे सर्वेक्षण करून शासनाला १९९५ साली धारावी पुनर्विकास योजना सादर केली. २००४ च्या निवडणुकीपूर्वी शिवसेना–भाजप युती सरकारने धारावीच्या ५२५ एकर जमिनीवरील प्रकल्पाला मान्यता देऊन झोपु प्राधिकरणावर जबाबदारी सोपवली. परंतु निवडणुकीत शिवसेना–भाजप युतीचा पराभव झाला आणि त्यानंतर १० वर्षं धारावी पुनर्विकास योजना मागे पडली. २०१४ साली शिवसेना–भाजप युतीला पुन्हा सत्ता मिळाली तरी त्यात भाजपचे वर्चस्व होते. धारावी योजनेच्या निविदांमध्ये बदल करून विकासक मिळविण्याचे प्रयत्न झाले. मुंबईमधील मोक्याची मौल्यवान जमीन, भरमसाट चटई क्षेत्र, उदंड आर्थिक फायदा ही आकर्षणे असल्याने स्थानिक–जागतिक विकासक आकर्षित होत होते. सत्तेत असूनही युतीमधील अंतर्गत स्पर्धेपायी बहुधा विकासक ठरविण्याचा निर्णय झाला नसावा. मुंबईचे जागरूक आणि जबाबदार आर्किटेक्ट, नगर नियोजनकार, प्रशासकीय अधिकारी सुरुवातीपासूनच या प्रकल्पाला विरोध करत होते. धारावीकरांच्या गरजा जाणून घेत स्वखर्चाने पर्यायी योजना मांडत होते. मुंबईच्या ‘अर्बन डिझाइन रिसर्च इन्स्टिट्यूट’ने (यूडीआरआय) २०१४ साली पुनर्विकासाच्या पर्यायी संकल्पनांचा शोध घेण्यासाठी स्पर्धा आयोजित केली. धारावीकरांच्या गरजा आणि मुंबईचे हित हे स्पर्धेचे मुख्य निकष होते. स्पर्धकांनी धारावीच्या इतिहास– भूगोलाचा, पायाभूत व्यवस्थांवरील ताणाचा, सामाजिक–आर्थिक परिणामांचा, बारकाईने अभ्यास करून विविध प्रकल्प संकल्पना सादर केल्या. शाश्वत पद्धतीने पुनर्विकास व्हावा, अशी प्रत्येक स्पर्धकाची तळमळ होती. नागरिकांना मिंधे करणाऱ्या फुकट घरांच्या धोरणाला त्यांनी विरोध केला होता. आर्थिक व्यवहार्यतेचा व भविष्यातील व्यवस्थापकीय बाबींचाही बारकाईने विचार करण्यात आला होता. यशस्वी ठरलेल्या १० योजनांचे आराखडे, संकल्पना यांचे खुले प्रदर्शन छत्रपती शिवाजी वस्तुसंग्रहालयात भरविण्यात आले होते. या सर्व नागरी उपक्रमांमध्ये वैशिष्ट्यपूर्ण अनुपस्थिती होती ती सर्व राजकीय पक्षांच्या धुरिणांची. विकासकांच्या आर्थिक लाभाला आणि राजकीय नेत्यांच्या सत्ताकांक्षेला स्पर्धेमध्ये प्राधान्य नसल्याने ते साहजिकच होते. शिवाय अनुपस्थिती होती ती पुनर्विकासाद्वारे फुकट घरांसाठी प्रलोभनाला बळी पडलेल्या, सरकारच्या आश्वासनांवर विश्वास ठेवणाऱ्या बहुसंख्य झोपडवासीयांची आणि चाळकरी भाडेकरूंची. २०१४ आणि २०१९ साली केंद्रात भाजपचे सरकार आले. महाराष्ट्रात शिवसेनेचे महत्त्व कमी झाले तरी २०१४ साली युती सरकार स्थापन केले. भाजपचे मुख्यमंत्री दिल्लीश्वरांच्या आदेशाने राज्य करू लागले. २०१९ साली युती तुटली. शिवसेना–काँगेस–राष्ट्रवादी यांचे आघाडीचे सरकार येऊन उद्धव ठाकरे मुख्यमंत्री झाले. दिल्लीश्वरांचे मनसुबे धुळीला मिळाले. नवीन राजकीय आघाडी स्वतंत्रपणे मुंबई आणि महाराष्ट्राच्या विकासाची दिशा ठरवू लागली. तेव्हा शिवसेनेत फूट पाडली गेली आणि फुटीर शिवसेनेच्या नेत्याला मुख्यमंत्री करून दिल्लीश्वरांच्या आदेशाने धारावी पुनर्विकास प्रकल्प अदानी समूहाला बहाल केला गेला. हा विनाशकारी प्रकल्प रद्द करणे गरजेचे आहे. धारावीकरांसाठी करण्यात येत असलेली ५०० चौ.फूट फुकट घराची मागणीही अयोग्य आणि अवास्तव आहे. मुळातच फुकट घरांचे, विकासकांच्या अफाट नफ्याच्या आधारावर विसंबून तयार झालेले धोरण, त्यावर आधारित धारावी पुनर्विकास योजना ही विकासकांनी तयार केलेली ‘पॉन्झी’ स्वरूपाची योजना होती. अशा पॉन्झी योजना निव्वळ गुंतवणूकदारांची फसवणूक करण्यासाठी असतात. त्यामध्ये गुंतवणूकदाराला मोठ्या नफ्याचे (इथे फुकट घराचे!) आश्वासन देऊन मायाजाल तयार केले जाते. सामान्य लोक सहज फसतात. पुनर्विकास प्रकल्प सुरूच झाला नाही तर झोपडपट्टीत अडकून वाट पाहतात, सुरू झालाच तर अनेक वर्षांसाठी दूर फेकले जातात आणि फुकट घर मिळालेच तर ते उद्योगधंदे, शाळा– दुकाने अशा गरजांसाठी पूरक नसते, आरोग्याला हानीकारक असते हे अनुभवतात. या भूलभुलय्यात सर्वसामान्य मुंबईकरांची एक संपूर्ण पिढी अडकली आहे. पुनर्विकासाच्या चुकीच्या धोरणांमुळे महाराष्ट्राची आर्थिक राजधानी मुंबईचा आणि त्यात राहणाऱ्या मुंबईकरांचा जीव गुदमरतो आहे.

प्रस्तावित धारावी प्रकल्प हा तर मुंबईच्या विनाशाची सर्वोच्च कडी आहे. क्रोनी भांडवलदार समूहाला तो बहाल करून युती सरकारने मुंबईकरांच्या पाठीत खंजीर खुपसला आहे. या फुकट घरांच्या धोरणाला तिलांजली देणे आवश्यक आहे. त्यानंतर लोकांच्या गरजा लक्षात घेऊन पुनर्विकासाच्या वास्तव, वैविध्यपूर्ण आणि नावीन्यपूर्ण धोरणांचा विचार करावा लागेल. प्रकल्प विरोधाच्या चार पावले पुढे जाऊन धारावी आणि मुंबईच्या विकासासाठी पर्याय मांडणे आवश्यक आहे. धारावीकरांना फुकट घरांचे मृगजळ न दाखवता मुंबईच्या शाश्वत विकासाचे, त्यांना सहभागी करून घेणारे धोरण मांडणे गरजेचे आहे. ज्यांच्या राबत्या शरीरावर मुंबई उभी राहिली त्या मराठी माणसांच्या हितासाठी हे अत्यावश्यक आहे.

# केज विधानसभा मतदार संघाचे मनसेचे उमेदवार रमेश गालफाडे यांच्या सभेचा उडाला फज्जा







केज/प्रतिनिधी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेचे केज विधानसभा मतदार संघाचे उमेदवार रमेश गालफाडे यांच्या सभेचा फज्जा उडाला आहे. गालफडे यांच्या सभेमध्ये नागरिकांपेक्षा खुर्च्यांचीच गर्दी पाहावयास मिळाली आहे. याबाबतचे सविस्तर वृत्त असे की, दिनांक १४ नोव्हेंबर २०२४ रोजी ११–०० वाजण्याच्या दरम्यान मोंढा मैदानावर रमेश गालफाडे यांच्या प्रचारार्थ मनसेचे संस्थापक अध्यक्ष राज साहेब ठाकरे यांच्या सभेचे आयोजन करण्यात आले होते. सुत्राकडून मिळालेल्या माहितीनुसार केज येथील सभेला नागरिकांची गर्दी न जमल्यामुळे मनसेचे संस्थापक अध्यक्ष राज साहेब ठाकरे यांनी सभेला न येन्याचा निर्णय घेतला आहे अशी चर्चा सभेच्या ठिकाणी ऐकण्यास मिळत होती.व आमच्या प्रतिनिधीशी प्रतिक्रिया देण्यास उपस्थित नागरिकांनी टाळाटाळ अकेली आहे. मनसेचे उमेदवार रमेश गालफाडे यांच्या प्रचाराचा नारळ त्यांच्या जन्मभूमी साळेगाव येथे फोडून प्रचारास प्रारंभ केला त्याही वेळी त्यांच्या जन्मभूमीमधून नागरिकांचा त्यांना प्रतिसाद मिळाला नाही असेही बोलले जात आहे. रमेश गालफाडे यांचे बंधू यांनी माजी आमदार संगीताताई ठोंबरे यांच्या नेतृत्वाखाली शरदचंद्र पवार यांच्या राष्ट्रवादी पक्षामध्ये मागील काही दिवसापूर्वीच पक्ष प्रवेश केला आहे. रमेश गालफाडे यांचे बंधूच त्यांची साथ सोडून गेले आहेत तर जनता त्यांना साथ कशी देईल असेही दबक्या आवाजात बोलले जात आहे. रमेश गालफाडे हे साळेगाव येथे न राहता ते सध्या पुणे येथे वास्तव्यास आहेत व ते एक मोठे उद्योजक आहेत त्यांचा केज मतदार संघामध्ये जनसंपर्क जास्त प्रमाणात नाही व त्यांना मानणारा वर्ग ही नसल्याचे बोलले जात आहे. ज्या पक्षाकडून ते उमेदवारी घेऊन निवडणुकीच्या रिंगणात उतरले त्याही पक्षाचे तुल्यबळ मतदारसंघांमध्ये नसल्याचे बोलले जात आहे. रमेश गालफाडे त्यांच्यावर स्वतःचे कुटुंबच नाराज आहे मग त्यांना जनता साथ कशी देईल असाही सवाल मतदारातून उपस्थित केला जात आहे आता मनसेचे इंजन पटरीवर चालेल की,थांबेल असेही बोलले जात आहे. केज मतदार संघहा बीड जिल्ह्यामध्ये येत आहे आणि रमेश गालफाडे हे केज विधानसभा मतदार संघाचे मनसेचे उमेदवार आहेत या सभेला केज मतदार संघातील मतदार व नागरिक येणे अपेक्षित होते परंतु या सभेला धाराशिव जिल्ह्यातील कळंब येथून काही तरुण युवक आले होते. मनसेचे संस्थापक अध्यक्ष राज साहेब ठाकरे हे या सभेला येणार नाहीत असे समजतात कळंब येथून आलेल्या युवकांनी सभेतून काढता पाय घेत कळंबकडे निघून गेले.

# स्थानिक स्वराज्य संस्था निवडणूक केव्हा होणार?

किनवट/शेख शौकत :–विधानसभा निवडणुकीमुळे सर्व पक्षांच्या हालचाली गतिमान झाल्या आहेत. विधानसभा निवडणुकीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घोषित होण्याची शक्यता आहे. त्यामुळे नगर पालिका, जिल्हा परिषद, पंचायत समितीसाठी इच्छुक असलेले देखील प्रचाराच्या निमित्त कामाला लागले आहेत. विधानसभा निवडणुकीनिमित्त अनेकांनी नगर परिषद, जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणुकीत आपली उमेदवारी निश्चित करण्यासाठी विधानसभा निवडणुकीच्या प्रचार माध्यमातून फिल्डिंग लावण्यास सुरुवात केली आहे. निवडणुकीत नगरपरिषद माजी सदस्य, जिल्हा परिषद, पंचायत समितीचे माजी सदस्य, पदाधिकारी व त्या निवडणुकीसाठी इच्छुकांची भूमिका ही महत्त्वाची ठरणार आहे. त्या अनुषंगाने पक्षाच्या कामाला ही युवा मंडळी लागली असून भेटीगाठीसह सोशल मीडियावर ही त्यांनी आपले जाळे मजबूत करण्यासाठी मी पक्षाचा किती निष्ठावंत आहे हे दाखविण्याचा प्रयत्न करीत असल्याचे दिसून येत आहे. यापूर्वी स्थानिक स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका घेण्याच्या हालचाली सुरू झाल्या होत्या. त्यासाठी प्रारूप आराखडा ही प्रसिद्ध झाला होता मात्र पुन्हा या निवडणुकांना ब्रेक लागल्याने या ना त्या कारणाने निवडणुका पुढे ढकलल्या. आता विधानसभा निवडणुकीनंतर स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकाही होण्याची प्रतीक्षा आहे. जिल्हा परिषद, पंचायत समितीतील इच्छुकांनी सक्रिय सहभाग घेण्यास सुरुवात केली आहे. त्यांनी आपला प्रभाग, गट, गणामध्ये संपर्क वाढविण्यात सुरुवात केली आहे. विधानसभा निवडणुकीत कोणाला कसा कौल जातो. त्यातूनच अनेकांची राजकीय दिशा या निमित्त निश्चित होणार आहे. सर्वच पक्षाचे कार्यकर्ते ही या निमित्त विधानसभा निवडणुकीत आपल्या उमेदवाराच्या प्रचारात व्यस्त झाले आहेत. गट, गण नगरपरिषद पंचायत समिती जिल्हा परिषद क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांच्या बैठकांवर पदाधिकारी भर देऊ लागले आहेत. विधानसभा निवडणुकीत त्यांची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. अनेकांनी स्थानिक स्वराज्य संस्था निवडणुकीत आपली उमेदवारी निश्चित व्हावी म्हणून आतापासून फिल्डींग लावली आहे.

# वनाझ परिवार विद्यामंदिर शाळेमध्ये बाल दिन उत्साहात साजरा करण्यात आला




पुणे/ प्रतिनीधी :– कोथरूड येथील गुरूवार १४ नोव्हेंबर २०२४ पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जयंतीनिमित्त बालदिन तसेच आनंद मेळावा शाळेत साजरा करण्यात आला या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुण्या म्हणून आदिती देवधर मॅडम उपस्थित होत्या तसेच कोथरूड विभागाचे सहाय्यक शिक्षक प्रमुख माननीय श्री. सुरेश उचाळे सर यांचे मोलाचे मार्गदर्शन मिळाले व पर्यवेक्षिका माननीय सौ.आनंदी वनवे मॅडम यांनी उपस्थिती दर्शविली. शाळेच्या उपमुख्याध्यापिका नीताताई जाधव पर्यवेक्षिका कांचनताई व मायाताई उपस्थित होत्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अर्चना जाधव यांनी केले व प्रास्ताविक अश्विनी चव्हाण यांनी केले व आभार प्रदर्शन प्रीतम दिवटे यांनी केले सांस्कृतिक समितीच्या प्रमुख मंदाकिनी लोहार यांनी कार्यक्रमाची रूपरेषा सूत्रबद्ध पद्धतीने करून कार्यक्रम अतिशय सुंदर रीतीने पार पाडण्यात आला आनंद मेळाव्या मध्ये विद्यार्थी व पालकांनी उत्साहाने सहभाग घेतला यामध्ये खाऊचे विविध स्टॉल लावण्यात आले होते तसेच खेळाचे व तिकीट घराचे देखील कामकाज व्यवस्थित रित्या पार पाडण्यात आले या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यात आला आणि विद्यार्थ्यांनी उत्साहाने सहभाग घेतला.

वनाझ परिवार विद्यामंदिर कोथरूड विभागातील प्रथम क्रमांकाची प्लास्टिक मुक्त शाळा म्हणून गौरव देखील करण्यात आला. अशाप्रकारे आनंद मेळावा मोठ्या उत्साहाने व आनंदाने शाळेमध्ये पार पाडण्यात आला.

# पृथ्वीराज साठे यांच्या प्रचारार्थ हारुणभाई इनामदार व सौ. सीताताई बनसोड यांचा झंझावत दौरा





केज/प्रतिनिधी हारुणभाई इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली व संदिपान तात्या हजारे व सुनील हिरवे यांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(ए)यांचा कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. पृथ्वीराज साठे यांच्या प्रचारार्थ जन विकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांचा झंजावत दौरा चालू असून प्रत्येक नागरिकांशी संवाद साधून पृथ्वीराज साठे यांना मतदान करावे असे नागरिकांना आवाहन करत आहेत. आज जनविकास आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली व संदिपान तात्या हजारे व सुनील हिरवे यांच्या नेतृत्वाखाली रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडिया(ए) केज तालुका यांच्या कार्यकर्त्यांच्या मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. केज शहरातील महात्मा फुले नगर भागातील जेके फंक्शन हॉल येथे दुपारी ३–०० वाजता कार्यकर्ता मेळाव्याचे आयोजन करण्यात आले आहे. जनविकास परिवर्तन आघाडीचे प्रमुख हारुणभाई इनामदार व नगराध्यक्षा सौ. सीताताई बनसोड यांच्यासह जनविकास परिवर्तन आघाडीच्या सर्व वरिष्ठ नेते व कार्यकर्त्यांनी मेळावा घेऊन पृथ्वीराज साठे यांना जाहीर पाठिंबा दिल्यापासून हारुणभाई इनामदार यांच्या मार्गदर्शनाखाली त्यांचे नगरसेवक व कार्यकर्ते पृथ्वीराज साठे यांच्या निवडणुकीच्या कामाला मोठ्या ताकतीनिशी लागले आहेत. हारुणभाई इनामदार यांनी मुस्लिम,दलित,मराठा समाजासह आठरा पगड जातीच्या समाज बांधवांना एकत्र करून महाविकास आघाडीच्या पदाधिकाऱ्यांसोबत खांद्याला खांदा लावून पृथ्वीराज साठे यांचे काम करत आहेत. मतदारसंघांमध्ये हारूनभाई इनामदार यांना मानणारा एक मोठा वर्ग आहे आणि त्यांचा जनसंपर्क देखील चांगल्या प्रकारचा असल्यामुळे याचा फायदा महाविकास आघाडीचे उमेदवार पृथ्वीराज साठे यांना नक्कीच होणार असे जनसामान्यातून बोलले जात आहे.

# माजी खासदार हरिश्चंद्र चव्हाण यांचे निधन



नाशिक : प्रतिनिधी दिंडोरी लोकसभा मतदारसंघाचे माजी खासदार हरिश्चंद्र चव्हाण यांचे गुरुवारी सकाळी दु:खद निधन झाले. त्यांच्या निधनाची माहिती दिंडोरी लोकसभा मतदारसंघात वा–यासारखी पसरली. त्यानंतर माजी खासदार हरिश्चंद चव्हाण यांच्या निधनाबाबत शोक व्यक्त करण्यात आला. त्यानंतर ठिकठिकाणी माजी खासदार हरिश्चंद चव्हाण यांच्या कार्याबद्दल चर्चा ऐकावयास मिळाली. हरिश्चंद चव्हाण यांची गेल्या काही दिवसांपासून प्रकृती बरी नव्हती. त्यांचे पार्थिव अन्त्यदर्शनासाठी पाटील गल्ली क्रमांक ४, कॉलेज रोड, नाशिक या त्यांच्या निवासस्थानी अन्त्यदर्शनासाठी ठेवण्यात आले आहे. हरिश्चंद्र चव्हाण यांनी २००९ आणि २०१४ च्या लोकसभा निवडणुकीवेळी दिंडोरी लोकसभा मतदारसंघातून विजय मिळवला. लोकसभा निवडणूक २०१४ मध्ये त्यांनी माजी खासदार भारती पवार यांचा मोठ्या फरकाने पराभव केला. भारती पवार त्यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसकडून लढल्या. दरम्यान २०१९ मध्ये भारती पवार भाजपामध्ये आल्या. त्यानंतर भाजपाने हरिश्चंद्र चव्हाण यांची उमेदवारी नाकारून भारती पवार यांना उमेदवारी दिली. २०१९ च्या लोकसभा निवडणुकीत भारती पवार यांनी मोठ्या फरकाने विजय मिळवला. भाजपाने भारती पवार यांना उमेदवारी दिली, त्यानंतरही हरिश्चंद चव्हाण हे भाजपाशी एकनिष्ठ राहिले. मालेगाव, दिंडोरीचे प्रतिनिधित्व मालेगाव आणि नंतर दिंडोरी लोकसभा मतदारसंघाचे खासदार म्हणून त्यांनी अनेक वर्षे प्रतिनिधित्व केले. पंचायत समिती, जिल्हा परिषद, इथेही त्यांनी पदे भूषवली. दिंडोरीचे खासदार असताना भाजपाचे सरकार वाचवण्यासाठी एअर ॲब्युलन्सने त्यांनी दिल्ली गाठली आणि मतदान केले.

# स्वराज्य पक्षाचे उमेदवार सतीश करंडे यांच्या प्रचारार्थ युवराज छत्रपती शहाजीराजे यांची आज गंजगोलाईतून भव्य रॅली





लातूर – लातूर शहर विधानसभा निवडणुकीची रणधुमाळी सध्या मोठ्या प्रमाणात सुरू असून लातूर शहर विधानसभा मतदारसंघातून परिवर्तन महाशक्ती आणि महाराष्ट्र स्वराज्य पक्षाच्या वतीने सतीश राजेंद्र करंडे हे निवडणुकीच्या रिंगणात उतरले असून त्यांच्या प्रचारार्थ आज शुक्रवार दिनांक १५ नोव्हेंबर रोजी युवराज छत्रपती शहाजी राजे हे लातूर दौऱ्यावर येत असून स्वराज्य पक्षाचे उमेदवार सतीश करंडे यांच्या प्रचारार्थ गंजगोलाई येथील आई जगदंबेची आरती करून भव्य रॅली काढण्यात येणार आहे. या रॅलीस मोठ्या संख्येने नागरिकांनी उपस्थित राहावे असे आवाहन स्वराज्य पक्षाचे सतीश करंडे यांनी केले आहे.

लातूर शहर विधानसभा मतदारसंघातून परिवर्तन महाशक्ती आणि महाराष्ट्र स्वराज्य पक्षाच्या वतीने सतीश राजेंद्र करंडे हे निवडणुकीच्या रिंगणात उतरले असून यांच्या प्रचारार्थ शुक्रवारी सकाळी ११:३० वाजता सोलापूर येथून लातूरकडे रवाना होणार आहेत, युवराज छत्रपती शहाजीराजे यांचे दुपारी २ वाजता लातूर शहरात आगमन होणार आहे दुपारी २ .२० वाजता युवराज छत्रपती शहाजीराजे हे छत्रपती चौक येथे भेट देणार असून दुपारी २.२० वाजता छत्रपती शिवरायांना अभिवादन करून दुपारी २:३० वाजता लातूर शहरातील गंजगोलाई येथे आगमन होऊन आई जगदंबेची आरती करून ३:०० वाजता युवराज छत्रपती शहाजीराजे यांची स्वराज्य पक्षाचे उमेदवार सतीश करंडे यांच्या प्रचारार्थ गंजगोलाई येथून भव्य रॅली काढण्यात येणार आहे.या रॅलीस लातूर शहरातील नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आव्हान परिवर्तन महाशक्ती आणि महाराष्ट्र स्वराज्य पक्षाचे उमेदवार सतीश करंडे यांनी केले आहे

# दूध, पनीर व दही यांपैकी कोणता पदार्थ आहे सर्वांत जास्त फायदेशीर? कसे करावे सेवन, घ्या तज्ज्ञांकडून जाणून.



तुम्हाला दूध, दही व पनीर यांसारखे दुधाचे पदार्थ आवडतात का? तुमचे उत्तर होय असेल, तर यापैकी एक आवडता पदार्थ निवडणे तुमच्यासाठी नक्कीच अवघड असू शकते. पण, तुमच्या पौष्टिक गरजा, प्राधान्ये व आहारावरील निर्बंध यांनुसार या पदार्थांपैकी कोणता पदार्थ तुमच्या आरोग्यासाठी सर्वांत जास्त चांगला आहे याबाबत तुम्ही कधी विचार केला आहे का? काळजी करू नका या लेखात तुमच्या प्रश्नाचे उत्तर नक्की मिळेल.

आहार तज्ज्ञ व पोषण तज्ज्ञ तन्वी सिंग म्हणाल्या, दूध, पनीर व दही यांचे पोषण घटकांनुसार आरोग्य फायदे आहेत.

दूध

दुधामध्ये पोटॅशियम हा घटक आहे आणि तो निरोगी हाडांची निर्मिती आणि रक्तदाबावर नियंत्रण ठेवणे यांसाठी फायदेशीर ठरतो.

दुधात हे पोषक गुणधर्म असतात

सरासरी, २५० मिली फॅट्समुक्त दुधात ९० कॅलरीज आणि नऊ ग्रॅम प्रथिने असतात.

एक कप चरबीमुक्त दुधामध्ये आठ टक्के जीवनसत्त्व बी १२, दोन टक्के जीवनसत्त्व ए, १२ टक्के कॅल्शियम, एक टक्का सोडियम, दोन टक्के मॅग्नेशियम व चार टक्के पोटॅशियम असते.

आयुर्वेदानुसार, दुधामधून मिळणारे पोषक घटक इतर कोणत्याही पदार्थामधून मिळू शकत नाहीत. दुधाचे पचन व्यवस्थित झाले, तर ते सर्व उतींना पोषण प्रदान करते आणि भावना संतुलित राहाव्यात यासाठी प्रोत्साहन देते आणि सर्व दोष संतुलित करण्यास मदत करते. ओजसला प्रोत्साहन देण्यासाठी हा सर्वांत महत्त्वाचा पदार्थ आहे, असे सिंग यांनी सांगितले.

ओजस हा एक संस्कृत शब्द आहे. ही महत्त्वाची उर्जा आहे, जी आपली प्रतिकारशक्ती, सामर्थ्य व आनंद या तीन गोष्टींवर नियंत्रण ठेवते.

दूध नीट पचण्यासाठी थंडगार दूध पिणे टाळावे. दूध उकळून प्यावे. दूध गरम करताना प्रथम त्याला चांगला फेस येऊ द्या आणि नंतर सुमारे ५ ते १० मिनिटे मंद आचेवर उकळू द्या. दूध गरम केल्याने त्याची आण्विक रचना बदलल्याने ते मानवी वापरासाठी सोपे होते आणि त्यामुळे कफदेखील कमी होतो, ज्यामुळे ते पचायला हलके होते, असे सिंग म्हणाल्या.

पनीर भरपूर प्रथिने आणि आवश्यक पोषक घटकांनी समृद्ध पनीर हे शक्ती आणि पोषणाचा स्त्रोत आहे. त्याचबरोबर ते पाचक आरोग्यास समर्थन देण्यासाठी आणि रोगप्रतिकार शक्तीला बळकटी देण्यासाठीही महत्त्वपूर्ण भूमिका बजावते. पनीर हा प्रथिनांचा उत्कृष्ट स्त्रोत आहे, जो दैनंदिन गरजा पूर्ण करण्यासाठी, स्नायूंची निर्मिती, दुरुस्ती आणि एकूणच शारीरिक कार्यांसाठी आवश्यक आहे. पनीर हा कमी–कार्ब आहाराचे पालन करणाऱ्यांसाठी योग्य पर्याय आहे, असे चेन्नईतील शाखेच्या क्लाउडनाईन ग्रुप ऑफ हॉस्पिटल्समध्ये नोंदणीकृत आहारतज्ज्ञ राम्या बी. यांनी सांगितले.

१०० ग्रॅम पनीरमधील समाविष्ट पौष्टिक घटक

कॅलरीज– ३२१

प्रथिने– २५ ग्रॅम

फॅट्स– २५ ग्रॅम

कर्बोदके– ३.५७ ग्रॅम*

दही

दुधाच्या तुलनेत दही पचवणे अधिक सोपे आहे आणि ते दीर्घकाळ पोट भरल्याची भावना निर्माण करते.चांगल्या बॅक्टेरियांनी समृद्ध दही पचनमार्ग साफ करण्यास आणि संक्रमण दूर ठेवण्यास मदत करते

ब

दह्यामध्ये पोषक गुणधर्म असतात

फॅट्सफक्त दह्याच्या एका कपामध्ये ९८ कॅलरीज आणि ११ ग्रॅम प्रथिने असू शकतात.

एक कप चरबीमुक्त दह्यामध्ये आठ टक्के बी १२ जीवनसत्त्व आणि दोन टक्के अ जीवनसत्त्व अशी दुधाइतकीच जीवनसत्त्वे असतात.

इतर गुणधर्मांची तुलना केल्यास, एक कप चरबीमुक्त दह्यामध्ये सुमारे आठ टक्के कॅल्शियम, १५ टक्के सोडियम, दोन टक्के मॅग्नेशियम व दोन टक्के पोटॅशियम असते.

आयुर्वेदानुसार दही खाण्याचे वेगवेगळे नियम आहेत, असे सिंग यांनी सांगितले.

रात्री दही खाऊ नये.

दह्याचे दररोज सेवन करण्यास मनाई आहे. कारण– दही हे पचायला जड आहे आणि ते शरीरात दाहकता वाढवते.

# चार वर्षात कोट्यावधी रुपयांची विकास कामे केली; काँग्रेसने पंधरा वर्षात काय केले जनतेला जाहीर सांगा

## खरोळा येथील प्रचार जाहीर सभेत महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड

लातूर : – लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघात गेल्या पंधरा वर्षापासून काँग्रेसचे आमदार आहेत या आमदारांनी काय केले कोणती विकासाची कामे केली हे एकदा जनतेला जाहीर सांगा. गेल्या चार वर्षात मतदार संघातील गावागावांत विकास कामासाठी कोट्यावधी रुपयाचा निधी आणण्यात मला यश आले. काँग्रेसची पंधरा वर्ष आणि माझ्या चार वर्षातील विकास कामाचा लेखात जोखा मांडण्यासाठी एका व्यासपीठावर यावे असे काँग्रेसला जाहीर आवाहन देऊन काँग्रेसला पंधरा वर्षे दिली आता मला पाच वर्ष काम करण्याची संधी द्या राज्यात लातूर ग्रामीण मतदार संघ विकासाचा एक मॉडेल करून दाखविन अशी ग्वाही भाजपा महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांनी दिली.

रेणापूर तालुक्यातील मौजे खरोळा येथे भाजपा महायुतीच्या प्रचारार्थ बुधवारी सायंकाळी जाहीर सभा झाली. या सभेला खरोळा आणि परिसरातील मतदार आणि महायुतीचे कार्यकर्ते हजारोंच्या संख्येने उपस्थित होते. या सभेस महायुतीचे उमेदवार आ. रमेशआप्पा कराड यांच्यासह माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड, शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख अँड बळवंतराव जाधव, जिपचे माजी उपाध्यक्ष रामचंद्र तिरुके, भाजपाचे ज्येष्ठ नेते ओमप्रकाश गोडभरले, किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, प्रदीप पाटील खंडापूरकर, ओबीसी मोर्चाचे भागवत सोट, पंचायत राज सेलचे जिल्हा संयोजक नवनाथ भोसले, फकीरा ब्रिगेडचे प्रा संजय शिंदे, युवा नेते ऋषिकेशदादा कराड, भाजपाचे जिल्हा सरचिटणीस महेंद्र गोडभरले, विधानसभा अध्यक्ष अनिल भिसे, तालुकाध्यक्ष दशरथ सरवदे, सांगायो समिती अध्यक्ष वसंत करमुडे, शिवसेनेचे कुलदीप ठाकूर, रिपाईचे धम्मानंद घोडके, अनंत चव्हाण, बायनाबाई साळवे, वसंतराव दहिफळे, श्रीकृष्ण मोटेगावकर, अमर चव्हाण, लक्ष्मण यादव, शरद दरेकर, नामदेव बोबंडे, अजय शेळके, मोहन राऊतराव, अनिरुद्ध आडतराव, सुधाकर काळे, वसंत कनामे, हनुमंत राऊतराव, अनिल येलगटे, रमाकांत फुलारी, सचिन आडतराव, चंद्रकांत आदुडे, बालाजी मानमोडे, बाळूआप्पा हेणे, भाऊसाहेब गुळबिले, सुरेश बुड्ढे, निवृत्ती चिद्रे, नानासाहेब माने, संगमेश्वर तत्तापूरे, ओम चव्हाण, राम बडे, शिवाजी उपाडे, शरद राऊतराव, दिलीप बरुरे, राजू कांबळे यांच्यासह अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.



लोकनेते स्वर्गीय गोपीनाथरावजी मुंडे साहेब यांच्या संस्कारात वाढलेला मी कार्यकर्ता आहे मुंडे साहेबांनी ज्या दिवशी माझ्यावर या लातूर ग्रामीण ची जबाबदारी दिली त्या दिवसापासून या मतदार संघाची प्रामाणिकपणे सेवा करीत असल्याचे सांगून आ. रमेशआप्पा कराड म्हणाले की, गेल्या निवडणुकीत पैशाच्या जोरावर मतदार संघ विकत घेण्याचा प्रयत्न झाला मात्र मतदाराने नोटाला विक्रमी मतदान केल्याने पक्षश्रेष्ठींनी मला आमदारकी दिली मिळालेल्या आमदारकीच्या माध्यमातून गोरगरीब सर्वसामान्यांच्या डोळ्यातील अश्रू पुसण्याचे काम केले. मतदार संघातील गावागावात कोट्यावधी रुपये खर्चाची विविध विकास कामे केली खरोळा, पांढरी, रेणापूर, पानगावसह मतदारसंघातील तब्बल साडेतीनशेहून अधिक मंदिराचा जिर्णोद्धार केला खरोळा जिल्हा परिषद मतदार संघातील गावागावात वाढीवस्तीत ७५ ते ८० कोटी रुपयांची कामे झाली असल्याचे सांगून निवडून गेलेले काँग्रेस आमदार पुन्हा गावात आले का त्यांनी कोणती कामे केली असा प्रश्न उपस्थित करून निष्क्रिय आमदाराला धडा शिकवण्याची हीच वेळ असल्याचे बोलून दाखवले.

उसाच्या टिपऱ्याचे राजकारण होऊ देणार नाही शेतकऱ्याचे हित डोळ्यासमोर ठेवून मी ही साखर कारखाना उभा केला आहे. महिनाभरात गाळप सुरू होईल निश्चितपणे मांजरा परिवारापेक्षा शंभर रुपये तरी अधिक भाव देईल असे सांगून लाडक्या बहिणीसह विविध योजना या पुढील काळातही सुरूच ठेवण्यासाठी आणि मतदारसंघाच्या सर्वांगीण विकासासाठी येत्या २० तारखेला कमळाच्या चिन्हा समोरील बटन दाबून मतदारांनी सेवा करण्याची संधी द्यावी असे आवाहन आ. रमेशआप्पा कराड यांनी केले.

शिवसेना जिल्हा संपर्कप्रमुख बळवंत जाधव म्हणाले की, बाळासाहेब ठाकरे यांनी आयुष्यभर काँग्रेसचा विरोध केला सत्ता आल्यानंतर स्वतः मुख्यमंत्री झाले नाहीत मनोहर जोशी, नारायण राणे यांना संधी दिली. गेल्या निवडणुकीत उद्धव ठाकरे यांनी लातूर ग्रामीणचा सौदा करून शिवसैनिकाचा केसांनी गळा कापला. बाळासाहेबांनी आयुष्यभर ज्या काँग्रेसचा विरोध केला त्याच काँग्रेसच्या मांडीवर उद्धव ठाकरे जाऊन बसले आणि स्वतः मुख्यमंत्री झाले स्वतःच्या मुलाला मंत्री केले असे सांगून राज्याचे मुख्यमंत्री एकनाथजी शिंदे यांनी अनेक जनहिताची कल्याणकारी कामे केली आहेत. काँग्रेस आमदाराला भेटणे सुद्धा शक्य नाही मात्र रमेशआप्पांचा दरवाजा चोवीस तास उघडा असतो तेव्हा आपल्या हितासाठी गावच्या विकासासाठी आणि मतदारसंघाच्या प्रगतीसाठी रमेश आप्पांनाच प्रचंड बहुमताने विजयी करावे असे आवाहन केले.

भाजपाच्या पाच तालुकाध्यक्ष ची नावे सुद्धा सांगता येत नाहीत अशा माणसाला जिल्हा परिषद सदस्य आणि खासदार केले दुसऱ्यांदा उमेदवारी दिली मात्र पक्षाने दिलेल्या सन्मानाची जाणीव न ठेवता स्वार्थाने चुकीचे वक्तव्य करीत आहेत रमेशआप्पा कराड निवडून आल्यानंतर शंभर टक्के मंत्री होणार असे माजी खासदार डॉ. सुनील गायकवाड यांनी बोलून दाखवले. गोपीनाथ मुंडे आणि विलासराव देशमुख यांच्या विचाराचा वारसा रमेशआप्पा कराड यांच्या कार्यातून दिसून येतो त्यांनी जातीपातीच्या पलीकडे जाऊन मतदार संघातील गोरगरीब सर्वसामान्यांच्या हितासाठी अनेक योजना राबवल्या गावागावात हजारो कोटीचा निधी आणून विकासाच्या योजना कार्यान्वित केल्या. आप्पांचा विजय आता कोणतीच शक्ती रोखू शकत नाही असे रामचंद्र तिरुके यांनी सांगितले.

या सभेत युवा नेते ऋषिकेशदादा कराड यांनी अत्यंत प्रभावी आणि दमदार भाषण केले. मतदान यंत्रावर दोन क्रमांकावर जरी रमेशआप्पांचे कमळ चिन्ह असले तरी निकालातून क्रमांक एकचे होणार असल्याचे सांगून विरोधकांनी कितीही चिखल फेक केला तरी याच चिखलातून कमळ उगवल्याशिवाय राहणार नाही असे बोलून दाखविले. सभेला उपस्थित असलेल्या मतदारांनी ऋषिकेश दादा यांच्या भाषणाला मोठी दाद दिली. यावेळी प्रा. संजय शिंदे, नवनाथ भोसले, सुरेश बुड्ढे यांनीही आपले मनोगत व्यक्त करून आमदार रमेश आप्पा कराड यांना प्रचंड बहुमताने विजयी करण्याचे आवाहन केले सभेचे सूत्रसंचालन चंद्रकांत कातळे यांनी केले तर शेवटी डॉ. महेंद्र पिंपळे यांनी उपस्थित यांचे आभार मानले. खरोळा येथील जाहीर सभेला मतदारांचा प्रचंड प्रतिसाद मिळाला लाडक्या बहिणीही या सभेला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या.

# लातूरला स्वतःची जहागीर समजणाऱ्यांना धडा शिकवा – केंद्रीय मंत्री पीयुष गोयल

**युद्धामुळे उत्पादनास उशीर ...**

पीयुष गोयल यांनी सांगितले की,सध्या जगात रशिया–युक्रेन व तसेच इस्त्रायलमध्ये युद्ध सुरू आहे.या दोन युद्धांमुळे जागतिक पातळीवर अनेक घटना घडत आहेत.याचा परिणाम अनेक उद्योगांवरही झाला आहे.या युद्धामुळेच लातूर येथील रेल्वे बोगी प्रकल्पातून उत्पादन सुरू करण्यास उशीर होत असल्याचे ते म्हणाले.

**वंदे भारतचे स्लीपर कोच लातूरमध्ये बनणार ...**

आपल्या भाषणात केंद्रीय मंत्री गोयल म्हणाले की,वंदे भारतचे स्लीपर कोच लातूर येथील बोगी फॅक्टरीमध्ये बनणार आहेत.२ हजार कोटी रुपयांचे उत्पादन लातुरात होणार असून त्यामुळे सहप्रकल्पांना बळ मिळणार आहे.या माध्यमातून १० हजार युवकांना रोजगार मिळणार असून लातुरच्या अर्थव्यवस्थेला गती मिळणार आहे,असेही पीयुष गोयल यांनी सांगितले.




लातूर/प्रतिनिधी :–जनतेच्या समस्यांकडे दुर्लक्ष करत १५ वर्ष पदे उपभोगली.आता लातूर मतदारसंघात अभिनेत्यांना फिरवून,फेक नरेटिव्हचा आधार घेत अपप्रचार सुरू आहे.खोटी आश्वासने,भडकाऊ भाषणे आणि समाजात भांडणे लावून निवडणूक जिंकण्याचा प्रयत्न सुरू आहे. विकासकामे न करता लातूरला जहागीर समजणाऱ्या आमदारांना त्यांची जागा दाखवून द्या,असे आवाहन केंद्रीय मंत्री पीयुष गोयल यांनी केले.

लातूर शहर मतदारसंघातील भाजपा महायुतीच्या उमेदवार डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या प्रचारार्थ आयोजित उद्योगपती व व्यापाऱ्यांच्या संवाद मेळाव्यात पीयुष गोयल बोलत होते.मंचावर आ.अमित गोरखे,उमेदवार डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर,भाजपा शहर जिल्हाध्यक्ष देविदास काळे, अविनाश कोळी,व्यापारी महासंघाचे अध्यक्ष रामदास भोसले,नंदू अग्रवाल,सीए संजय अग्रवाल,प्रदीप सोळंकी यांच्यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना पीयुष गोयल म्हणाले की,महाविकास आघाडी महाराष्ट्राला विनाशाकडे नेण्याचे काम करत आहे.ही महाविकास नव्हे तर महाविनाश आघाडी आहे.फेक नरेटिव्ह पसरवून अपप्रचार करण्याचे काम आघाडीकडून केले जात आहे.लातूर मतदारसंघात अभिनेत्यांना आणून जनतेचे मनोरंजन केले जात आहे.खोटी आश्वासने देत दिशाभूल करून, भाषणातून माथी भडकवण्याचे काम सुरू आहे.समाजा–समाजात,जाती–जातीत भांडणे लावण्याचे काम केले जात आहे. जे काम आपल्याला करता आले नाही त्याचे खापर इतरांच्या माथ्यावर फोडण्याचे काम सुरू असल्याचेही पीयुष गोयल यांनी सांगितले.

राज्यात पुन्हा एकदा महायुतीचे सरकार येणार असल्याचे अंदाज विविध सर्वेक्षणातून व्यक्त झाले आहेत. लातूर मतदारसंघात महायुतीने एक उच्चशिक्षित व कर्तृत्ववान महिला उमेदवार दिला आहे. लातूरच्या विकासाचा आवाज बुलंद करण्यासाठी या उमेदवाराच्या पाठीशी रहा. त्यासाठी उर्वरित ६ दिवस महायुतीला द्या.मतदारसंघात ८० टक्के मतदान करून घ्या.अमित देशमुख व धीरज देशमुख यांना पराभूत करून जनतेचा विश्वासघात करणाऱ्यांना धडा शिकवा,असे आवाहनही पीयुष गोयल यांनी केले.

लातूरकडे ८ वर्ष राज्याचे नेतृत्व होते. त्याच मुख्यमंत्र्यांची दोन्ही मुले आमदार आहेत. तरीही लातूरचा विकास झाला नाही. व्यापार–उद्योगाच्या समस्या कायमच राहिल्या. त्यांच्या निराकरणासाठी आमदारांनी काम केले नाही.रेल्वे सारख्या महत्त्वाच्या प्रश्नावरही मंत्र्यांना भेटण्यास आमदारांना वेळ मिळाला नाही.मुख्यमंत्री असताना देशमुख यांनी मराठवाड्यासाठी एक तरी मोठा प्रकल्प आणला का ? असे सवाल करत भाजपचे नेते माझ्याकडे आल्यामुळेच रेल्वे बोगी प्रकल्प मंजूर केला.आपण यावेळी डॉ.चाकुरकर यांना निवडून द्या.त्या मुंबई व दिल्लीतून आपल्यासाठी प्रकल्प खेचून आणतील,असेही पीयुष गोयल म्हणाले.

यावेळी मनोगत व्यक्त करताना उमेदवार डॉ.अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी लातूर हे मराठवाड्यातील एक मोठे व्यापार व उद्योग केंद्र आहे असे सांगत रेल्वे कोच फॅक्टरी लातूरसाठी दिल्याबद्दल पीयुष गोयल यांचे आभार मानले.या प्रकल्पात अजून उत्पादन सुरू झाले नसून ते लवकर सुरू व्हावे. या प्रकल्पासाठी आवश्यक असणारे २५० सह प्रकल्प लातूर एमआयडीसीत व्हावेत,अशी मागणी केली.यातून येथील तरुणांना उद्योग उभारता येतील. लातुरची अर्थव्यवस्था गतिमान होईल,असे ताई म्हणाल्या. लातूर मधून मोठ्या प्रमाणात जीएसटी व आयकर भरला जातो परंतु त्याच्याशी संबंधित कार्यालय नांदेड येथे आहे.ते लातूर येथे हलवावे.लातूर येथे मोठा उद्योग सुरू करण्यासाठी प्रयत्न करावेत,आदी मागण्या केल्या.

रामदास भोसले यांनी या मेळाव्याचे प्रास्ताविक केले.या मेळाव्यास जितेश चापसी,दिनेश गिल्डा,मुस्तफा शेख,विशाल अग्रवाल,भारत माळवदकर, फय्याज पटेल यांच्यासह शैलेश गोजमगुंडे,ड.दिग्विजय काथवटे व शहरातील उद्योजक, व्यापारी,सीए आणि विविध समाज घटकातील मान्यवर, महायुतीच्या पदाधिकाऱ्यांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# शिटीची हवागुल व तुतारीकडे कार्यकर्त्यांची धावपळ

किनवट / (ता.प्र.) :– किनवट/माहूर विधानसभा मतदारसंघांमध्ये प्रचार शिगेला पोहोचला असून खऱ्या अर्थाने प्रचाराची रणधुमाळी आज स्थितीला पहावयास मिळत आहे. त्यातच वेगवेगळ्या राजकीय पक्षातील कार्यकर्ते वेगवेगळ्या पक्षात कोलांट उड्या मारताना दिसून येत आहेत. ज्या पद्धतीने महाराष्ट्रामध्ये सत्तांतर घडून आले त्याच पद्धतीने विधानसभा निवडणुकीच्या काळामध्ये किनवट मतदार संघात कार्यकर्त्यांनी या पक्षांतून दुसऱ्या पक्षात पक्षप्रवेश करण्यास सुरुवात केल्याने मतदार मात्र संभ्रमात व राजकीय पक्षाची नेते मंडळी भ्रमात असल्याची भयावह चित्र संपूर्ण मतदार संघातील ग्रामीण भागातील तांडे वाड्यामध्ये पहावयास मिळत आहे. त्यातच जबाबदार राष्ट्रीय पक्षात पदाधिकारी असलेली कांही कार्यकर्ते मंडळी दिवसा अपक्ष सचिन नाईका सोबत शिटीचा प्रचार करताना प्रचार करताना फिरताना दिसून येतात तर सायंकाळी शरदचंद्र पवार गटाच्या माजी आमदार प्रदीप नाईकांच्या तुतारीला मिठी मारताना पहावयास मिळत आहेत. त्यामुळे मतदाराचा कार्यकर्त्यावरील विश्वास उडाल्या शिवाय राहणार नाही तितकेच खरे आपला कार्यकर्ता दुसऱ्या पक्षात जाऊ नये व दुसऱ्या पक्षातील कार्यकर्ता कशा पद्धतीने आपल्याकडे खेचता येईल याची खबरदारी आज घडीला सर्वच राजकीय पक्षाचे पदाधिकारी व नेते मंडळी घेत असताना पहावयास मिळत आहेत. प्रचाराच्या शिल्लक राहिलेल्या पुढच्या पाच ते सहा दिवसात अजून काही मोठ्या घडामोडी होण्याची शक्यता मतदार संघांमध्ये नाकारता येत नाही दलबदलू कार्यकर्त्याकडे मतदार मात्र वेगळ्या नजरेनेच बघत आहेत एवढे मात्र निश्चित. पण कधी नव्हे ते कार्यकर्त्याला सुगीचे दिवस आले म्हणणे काही वावगे ठरणार नाही. अशा कोलांट उड्या मारणाऱ्या या कार्यकर्त्यामुळे निष्ठावंत कार्यकर्त्याची मात्र गोची होणार व शिटीची हवा गुल होणार एवढे मात्र तितकेच खरे असल्याच्या प्रतिक्रिया सुद्धा निष्ठावंत कार्यकर्ते मंडळींकडून ऐकावयास मिळत आहेत.

# लातूरकर विकास करणाऱ्यांच्या पाठीशी, माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्या प्रचार रॅलीला उस्फुर्त प्रतिसाद

लातूर /प्रतिनीधी : – ही निवडणूक महाराष्ट्राच्या स्वाभिमानाची, अस्मितेची निवडणूक आहे. तुमच्या आशीर्वादाने आपल्याला विजयाचा चौकार मारायचा आहे. आपण विकास करणाऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहा, असे आवाहन काँग्रेस–महाविकास आघाडीचे लातूर शहर मतदारसंघातील उमेदवार माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केले. लातूर शहर विधानसभा मतदारसंघाचे महाविकास आघाडी काँग्रेसचे अधिकृत उमेदवार अमित विलासराव देशमुख यांनी जनसंपर्क अभियाना अंतर्गत बुधवार बुधवा दि. १३ नोव्हेंबर रोजी सायंकाळी शहरातील प्रभाग ९, १३, १४, व १५ प्रभागांतून भव्य प्रचार रॅली काढण्यात आली. यावेळी ते बोलत होते. या रॅलीला या चारही प्रभागांतील मतदारांनी उस्फुर्त प्रतिसाद दिला. पुरुष महिला युवती मोठया प्रमाणात या रॅलीत सहभागी झाले होते. महीलांची, युवकांची संख्या लक्षणिय होती. प्रभाग क्रमांक. १३ मध्ये संविधान चौक येथे माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांचे आगमन होताच फटाक्यांच्या आतषबाजीत त्यांचे स्वागत करण्यात आले. तेथून प्रचार रॅलीस सुरुवात झाली. काँग्रेस पक्षाच्या विजयाच्या घोषणांनी परीसर दुमदूमून गेला. रॅली मार्गावर अनेक ठिकाणी नागरिकांनी रांगोळी काढून मार्ग सुशोभित केला होता.,अनेक घरांच्या छतावरुन रॅलीवर पुष्पवृष्टी करण्यात आली, हातात फलक, झेडे घेऊन मोठया संख्येने पदाधिकारी, कार्यकर्ते नागरीक सहभागी झाले होते. विरोधी पक्षाने १५ दिवसांत उमेदवार आयात केला. या निवडणुकीत लातूरकरांना गांभीर्याने विचार करायचा आहे. ही महाराष्ट्राच्या स्वाभिमानाची, महाराष्ट्राच्या अस्मितेची निवडणूक आहे. या निवडणुकीत तुमच्या आशीर्वादाने आपल्याला विजयाचा चौकार मारायचा आहे. प्रत्येकाने मतदान करावे, कोणीही मतदानापासून वंचित राहू नये. विरोधी पक्षाकडे उमेदवार नव्हता. त्यांनी हा लादलेला उमदेवार १५ दिवसांत आयात केला आहे. पण लातूरकर जनता सूज्ञ आहे. ते विकास करणाऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहतील, असे सांगताना आमदार अमित देशमुख यांनी येत्या २० तारखेला बहुमताने विजयी करण्याचे मतदारांना आवाहन केले. संवीधान चौकापासुन सुरुवात होवून खाडगाव रोड, हिप्परकर कॉम्पलेक्स त्यानंतर प्रभाग क्रमांक १४ मध्ये गणेश चौक पासुन सुरुवात झाली व महसुल कॉलनी, जुना औसा रोड, श्रीराम चौक, दादाजी कोंडदेव नगर, केदारनाथ शाळेजवळून प्रभाग क्रमांक १५ मध्ये लगस्कर बिल्डींग पासुन सुरुवात झाली ते देशमुख हॉस्पिटल, आदर्श कॉलनी कमान कम्युनिटी हॉल, नारायण नगर, सिताराम चौक, अष्टविनायक मंदीर, शिवनगर, शिवनगर, ठाकरे चौक येथून प्रभाग क्रमांक ९ मधील मिनी मार्केट, कामदार रोड, बसवेश्वर कॉलेज, मनपा मागील बाजुने, विलासराव देशमुख पार्क, शिवनेरी गेट, येथे सदरील रॅलीचा समारोप करण्यात आला. या रॅलीमध्ये युवकांचा सहभाग लक्षणिय होता. 'महाविकास आघाडीचा विजय असो', 'अमित देशमुख तूम आगे बढो हम तुम्हारे साथ है', अशा घोषांचा संपूर्ण परिसरात आवाज घुमला. महिला, युवती, पुरुषही मोठ्या संख्येने प्रचार रॅलीत सहभागी झाले होते. यावेळी पदाधिकारी, नागरिक महिला मोठ्या संख्येने उपस्थित होते





PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE